


# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २७२ वा ❑ शुक्रवार दि.२६ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## नाव बदलल्याने ग्रामीण वास्तविकता बदलेल काय?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

केंद्रातील मोदी सरकारने ग्रामीण रोजगार योजनेच्या नावात आणि रचनेत मोठा बदल केला आहे. विरोधकांच्या निषेधादरम्यान लोकसभेने गुरुवारी विकासित भारत–जी राम जी विधेयक, २०२५ मंजूर केले. प्रस्तावानुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याचे (मनरेगा) नवीन नाव रोजगार आणि आजीविका मिशन ग्रामीणसाठी विकासित भारत हमी असेल. यासोबतच, असा दावा केला जात आहे की ग्रामीण कुटुंबांना उपलब्ध असलेल्या हमी रोजगाराच्या दिवसांची संख्या १०० वरून १२५ दिवसांपर्यंत वाढवली जाईल. परंतु प्रश्न असा आहे की या बदलामुळे योजनेची वास्तविकता बदलेल की परिस्थिती तशीच राहील? ग्रामीण भागातील कुटुंबांना १२५ दिवस रोजगार मिळेल काय?

ग्रामीण कुटुंबांना रोजगाराचे इतर पर्याय नसताना मनरेगा ही योजना त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. दुष्काळ, पूर किंवा शेतीच्या हंगामाव्यतिरिक्त, ही योजना जीवनरेखा ठरू शकते. तथापि, वास्तविकता अशी आहे की काम नियमित नसते किंवा वेळेवर वेतन दिले जात नाही. विलंबित वेतन आणि कामाचा अभाव यामुळे कामगारांचा आत्मविश्वास सातत्याने कमी होत चालला आहे.

इतिहास दाखवतो की मनरेगाचे नाव बदलल्याने व्यवस्था सुधारत नाही. पूर्वी या योजनेला राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (नरेगा) असे म्हटले जात असे. काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने त्यात महात्मा गांधींचे नाव जोडले, परंतु ग्रामीण भागातील लोकांना हमी असलेल्या रोजगाराबाबतची परिस्थिती तशीच राहिली. ही योजना १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देते, परंतु सत्य हे आहे की देशातील कोणतेही राज्य सरासरी १०० दिवस काम देऊ शकलेले नाही.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांत मनरेगा अंतर्गत प्रति कुटुंब फक्त ५०.३५ दिवसांचा रोजगार उपलब्ध झाला आहे. मनरेगाचे पुनर्ब्रँडिंग आणि १२५ दिवसांची नवीन हमी किती प्रभावी ठरेल हे येणारा काळच सांगेल. इतर रोजगार पर्याय मर्यादित असताना ही योजना ग्रामीण कुटुंबांना उपजीविकेचा आधार देते. तथापि, वास्तविकता अशी आहे की त्यांना नियमित काम मिळत नाही किंवा दरवर्षी १०० दिवसांच्या कामाची हमी मिळत नाही.

केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या आकडेवारीचा विचार केला तर, २०२४–२५ मध्ये मनरेगा अंतर्गत हरियाणामध्ये सर्वाधिक ३७४ रुपये दैनिक वेतन आहे, परंतु तेथेही, प्रति कुटुंब सरासरी फक्त ३४.११ दिवस काम मिळाले. अरुणाचल प्रदेशमध्ये सर्वात कमी वेतन २३४ रुपये आहे, जरी तेथे प्रति कुटुंब सरासरी ६७.९ दिवस काम मिळाले. उत्तर प्रदेशमध्ये परिस्थिती आणखी वाईट आहे, जिथे प्रति कुटुंब सरासरी वर्षाला ५१.५५ दिवस काम मिळाले आणि मजुरी २३७ रुपये प्रति दिन होती. याचा अर्थ दरवर्षी १२,००० रुपये आणि प्रति कुटुंब दरमहा १००० रुपये कमाई होते. आता, महागाईच्या या युगात, दरमहा १००० रुपयांवर कुटुंब कसे जगेल हा चिंतेचा विषय आहे.

एक योजना, वेगवेगळे वेतन

मनरेगा ही एक केंद्रीय योजना आहे, परंतु राज्यानुसार वेतन वेगवेगळे असते. ''एक राष्ट्र, एक वेतन'' हे तत्व येथे लागू होत नाही. म्हणूनच सरासरी वेतन आणि कामाच्या दिवसांची गणना ग्रामीण बेरोजगारी आणि गरिबीत कोणताही महत्त्वपूर्ण बदल दर्शवत नाही. निष्कर्ष स्पष्ट आहे: केवळ नाव बदलणे आणि दिवसांची संख्या वाढवणे यापेक्षाही मनरेगा नियमित, पारदर्शक आणि उत्पादनाशी जोडले जाणे महत्त्वाचे आहे. अन्यथा, जुन्या आश्वासनांप्रमाणेच नवीन नाव कागदावर मर्यादित राहील.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) ही जगातील सर्वात मोठी सामाजिक सुरक्षा योजना आहे. ती काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत भारतातील प्रत्येक गावात लागू केली जाते. आतापर्यंत जवळजवळ २५ कोटी कामगार या योजनेत सामील झाले आहेत आणि १४ कोटी ३३ लाख कामगार सतत सक्रिय आहेत. २६९,००० ग्राम पंचायती, ७,००० हून अधिक गट आणि ७०० हून अधिक जिल्ह्यांमध्ये याचा विस्तार आहे. याचा अर्थ असा की योजनेतील कोणताही बदल सर्वांवर समान परिणाम करेल.




# साधू-संत येती घरा तोचि दिवाळी-दसरा

## ९९ व्या अ.भा.साहित्य संमेलनसाठी सातारकर सज्ज

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – सातारा येथे होत असलेल्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी येणाऱ्या साहित्यिकांना सातारकरांचा पाहुणचार घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. संयोजन समितीने केलेल्या आवाहनास प्रतिसाद देत साहित्यप्रेमी सातारकर लेखक आणि कवींच्या निवासाची व्यवस्था आपल्या घरांत करणार आहेत. या निमित्ताने साहित्य व संस्कृतीचा जागर करीत, साहित्यिकांचा सहवास घेत सातारकर त्यांच्या लिखाणाचे पैलू जाणून घेणार आहेत. तसेच साहित्यिक वाचकांच्या आवडीनिवडी, विचार जाणून घेत भविष्यातील साहित्यकृतींना वेगळा आयाम देऊ शकणार आहेत.




ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मराठा साम्राज्याची राजधानी असलेल्या साताऱ्यात १९९३ साली ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्याचे स्वागताध्यक्ष अभयसिंहराजे भोसले होते. त्यांच्या संकल्पनेतून संमेलनाला येणाऱ्या अनेक साहित्यिकांची सातारकरांच्या घरोघरी निवासाची सोय करण्यात आली होती. हीच अनोखी संकल्पना त्यांचे पुत्र व ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पुन्हा एकदा राबविली जाणार आहे.

समृद्ध साहित्यिक वारसा लाभलेल्या सातारा जिल्ह्यात ९९वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत आहे. साताऱ्यातील नगरवाचनालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा शाहूपुरी (सातारा) हे साहित्य आणि संस्कृतीचे प्रेरणास्थान आहेत. सातारा नगरीत होत असलेल्या साहित्यविषयक उपक्रमांना तसेच ग्रंथ प्रदर्शनांना सातारकर नेहमीच मोठ्या संख्येने हजेरी लावत असतात.

घरोघरी साहित्यिक ही संकल्पना राबविण्याचे निश्चित झाल्यानंतर सातारकर साहित्यप्रेमींनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सातारकरांनी आपल्या आपुलकीपूर्ण स्वभावानुसार राज्यातील विविध भागातून संमेलनाला येणाऱ्या साहित्यिकांना आपल्या निवासस्थानी राहण्यासाठी आमंत्रित केले आहे. नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असलेल्या या उपक्रमासाठी निवासी सुविधा समिती स्थापन करण्यात आली आहे. श्रीराम नानल या समितीचे मुख्य समन्वयक आहेत. समितीमध्ये पद्माकर पाठक, ॲड. सीमा नूलकर, डॉ. संदीप श्रोत्री यांचा समावेश असून त्यांना नंदकुमार सावंत आणि विनोद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

साहित्यिकांशी मनमुराद संवाद साधताना सातारकर साहित्यिकांची फक्त निवास व्यवस्थाच करणार नसून आपल्या निवासस्थानापासून संमेलन स्थळापर्यंत जाण्याचीही सुविधा उपलब्ध करून देणार आहेत. संमेलनाविषयी वृत्तपत्रात आलेले वृत्तांकन साहित्यिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी देखील सातारकर तत्पर राहणार आहेत. 'साधू-संत येती घरा तोचि दिवाळी-दसरा' या उक्तीनुसार लेखक आणि कवींचे स्वागत करण्याबरोबरच घरगुती पाहुणचारासह सरबराईमध्ये सातारकर व्यग्र झाले आहेत.

# प्रसिद्ध चित्रकार अमोल पालेकर

**ज्योतिर्मय साहित्य**

रविवार २१ डिसेंबर २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड–पुणे येथे रोटरी–डिस्ट्रीक्ट ३१३१ यांनी आयोजित केलेल्या दोन दिवसीय रोटरी मराठी साहित्य संमेलनात ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर, आणि दिग्दर्शिका संध्या गोखले यांची उत्तरा मोने यांनी घेतलेली मुलाखत ऐकण्याचा योग आला. या मुलाखतीत उत्तरा मोने सांगत होत्या.. अमोल पालेकर यांनी त्यांनी चितारलेली चित्रे विकली ज्यामुळे त्यांना साधारण एक कोटी रूपये आले, ते त्यांनी सामाजिक कार्य करणाऱ्या विविध संस्थांना त्यांच्या कार्यासाठी दिले. पण याची वाच्यता कुठेही केली नाही. साधारणपणे ७००–८०० मराठी भाषिक रसीक ही मुलाखत तन्मयतेने ऐकत होते. बहुतेकांना अमोल पालेकर हे प्रसिद्ध चित्रकार आहेत याची कल्पनाही नव्हती. अमोल पालेकर यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईतील बालमोहन विद्यामंदीर येथे झालेय. त्याकाळातल्या ११ वीच्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेनंतर त्यांनी सर जे.जे. स्कूल आर्टमध्ये औपचारिक शिक्षण घेतले. २४ नोव्हेंबर १९४४ जन्मतारीख असलेल्या अमोल पालेकर यांनी १९६० च्या दशकाच्या सुरवातील जे.जे स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेऊन १९६७ मध्ये पेंटिंग आणि अप्लाइड आर्टचा डिप्लोमा पूर्ण केला, ज्याचा कालावधी सहा वर्षाचा होता. त्याकाळात अर्जदारांच्या पात्रता प्रमाणपत्रांसह इंटरव्ह्यू, प्रॅक्टिकल चाचण्या घेतल्या जायच्या. यासाठी जनरल नॉलेज पेपर आणि प्रॅक्टिकल सब्जेक्ट्स (जसे पेंटिंग, मॉडेलिंग) चा समावेश होता. अमोल पालेकर त्यांच्या मुलाखतीत सांगत होते... मी पक्का मुंबईकर पण आता पुणेकर झालोय. पूर्वीची मुंबई आता राहिली नाही. गुगल मॅपशिवाय मी आता मुंबईत फिरू शकत नाही. आपल्या महाराष्ट्रात ऐकण्यासाठी रसिकांचा कान तयार झालेला आहे. संगीत क्षेत्रात महाराष्ट्राला पूर्वांपार जी ऐकण्याची परंपरा निर्माण झालेली आहे त्यामुळे आपण संगीत क्षेत्रामध्ये आघाडीवर आहोत. पण दृष्य बघण्यामध्ये म्हणजेच चित्र पाहणे या क्षेत्रात मात्र आपण मागासलेले आहोत. कोणतीही दृष्य गोष्ट आपणाला आवडली का नाही याचे विश्लेषण करता आले पहिजे. आवडली तर का आवडली हा प्रश्न आपल्या मनात उपस्थित झाला पाहिजे. संत ज्ञानेश्वर यांनी म्हंटलेले विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशलें । ही भावना चित्रात कशी दाखवणार ? तर ते अमूर्त शैलितच



दाखविले पाहिजे. ते पानंफुलं या पध्दतीने नाही सांगता येणार. मी शाळेत असताना सिन्नरकर या चित्रकलेच्या शिक्षकांनी जास्वंदाच फुल आणि त्याची पाने आम्हाला रंगवायला सांगीतली. मी ते अतीशय सुंदर पद्धतीने गुळगुळीत चित्र पान–फुलांसह तयार केले. सरांनी ते बघीतले आणि मला म्हणाले.. तू जास्वंदीच्या फुलाचे पान कधी हाताने बघीतले आहेस का? त्या पानाचा खरखरीतपणा तू काढलेल्या चित्रात दिसत नाही. जो पोत आणि टेक्चर आहे, हे सगळं खरं म्हणजे अमूर्त आहे आणि सरांनी ते अतीशय सुंदर पध्दतीने मला समजाऊन सांगितले. अशी माझी चित्रकलेमध्ये समंजस वाढ होत गेली. त्याकाळात मी चित्रकलेमध्ये प्रचंड काम केले.

माझं तेंव्हा जे.जे. मधील शिक्षण घेतल्यानंतर एकट्याचे एक्झिबिशन वेगवेगळ्या चित्रकृतींचे ताज गॅलरीमध्ये आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन बघून दोन चांगल्या ऑर्डर्स आल्या. एक होती बॉम्बे पोर्टसची. एक नवीन हॉस्पिटल बांधल जात होत त्याठिकाणी म्युरल्स करायची ऑर्डर मिळाली. जॉन्सन ॲन्ड जॉन्सन कंपनीचा ब्रिटीश मॅनेजींग डायरेक्टर रिटायर होऊन जात होता, त्याचे पोर्टेट करायची होती. अशा दोन ऑर्डर्स मिळताना मी सांगितलं कि, मी वास्तववादी पध्दतीत चित्र करीत नाही. हे जर तुम्हाला मान्य असेल तर मला हे करायला खूप आवडेल. दोन्ही कडच्या लोकांनी मला असे सांगितलं की, आम्ही तुमची चित्र बघीतली आहेत आणि ती आम्हाला आवडली आहेत म्हणूनच आम्ही तुमच्याकडे आलोय या दोन्ही ऑर्डर पूर्ण झाल्यानंतर १९६७–६८ च्या काळात मला दोन्हीकडच्या कामाचे मिळून लाखापेक्षा जास्त रुपये मिळाले. यामुळे मला मिळालेला आत्मविश्वास सर्व कार्यक्षेत्रामध्ये लोकांना काय आवडत त्यापेक्षा मला जे आवडतं तेच मी केलं तर ते लोकांपर्यंत पोहोचत आणि लोकांना आवडते आणि त्यातून अर्थार्जनही चांगल होतं हा विश्वास मिळाला. ज्यामुळे चित्रकला, अभिनय आणि इतर सर्व कार्यात माझा पुढचा प्रवास फार सोपा झाला.

ही मुलाखत ऐकत असताना दोन महिन्यापूर्वी प्रसिद्ध चित्रकार रविमुकुल यांच्याशी झालेली चर्चा मला आठवली. लहानपणापासूनच आपण चित्राकडे लक्ष देत नाही. आपल्याला वडीलधारी सांगत होती की, चित्रकलेऐवजी गणित, इंग्रजी विषयाकडे लक्ष दे. क्रिएटीव्हीटी गोष्ट शिकण्याकडे आपले लक्षच नाही. त्यामुळे मराठी चित्रकला हा प्रकार विकसित होण्यामध्ये मर्यादा निर्माण झाल्या. राजस्थानी, मुघल, बंगाली आणि इतर चित्रकला या त्यांच्या त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे. त्या त्या लोकांची, प्रदेशाची विशिष्ठ प्रकारची चित्रशैलीची संस्कृती विकसित झाली आहे. या वेगवेगळ्या प्रांताच्या चित्रकार शैली बघण्याची दृष्टी तेथील लोकांच्यात विकसित झाली आहे. नाटक, संगीत, चित्रकला आणि इतर कलांच्याबाबतीत भारतामधील वेगवेगळे प्रांत आघाडीवर आहेत. मी कलकत्ता या ठिकाणी जून–जुलै मध्ये गेलो असताना वेगवेगळी म्युझिअम्स, चित्रकलेसह विविध गोष्टींनी अद्ययावत करण्यात आलेली माझ्या बघण्यात आली. चित्रे बघण्याची बंगाल मधील लोकांची जी दृष्टी आहे ती आपणाकडे येण्यासाठी कायमच वेगवेगळी चित्र–प्रदर्शने आपण भरविली पाहिजेत ज्यामुळे नवीन पिढीचा चित्रे बघण्यामधील दृष्टिकोन परिपक्क होईल. चित्रकार, अभिनेते अमोल पालेकर यांचे आत्मकथनात्मक ऐवज हे पुस्तक विविध भाषेत प्रकाशित झाले. सारनाथ बनर्जी हे भारतातील अग्रगण्य चित्रकादंबरीकार (ग्राफिक नॉव्हेलिस्ट) आहेत. ज्यांनी चित्रकादंबरी या प्रकाराला भारतात लोकप्रिय केले. ज्यांच्या प्रमुख कलाकृतींमध्ये कॉरिडॉर, दबर्न ओव्ल्स वंडरस कॅपर्स यांसारख्या इंग्रजी पुस्तकांचा समावेश आहे. ज्यात शहरी जीवन, इतिहास आणि सामाजिक व्यंग्य यांचे चित्रण आहे. मराठी अनुवादित स्वरूपात त्यांची पुस्तके अद्याप उपलब्ध नाहीत. १९७२ साली जन्म झालेले सारनाथ बॅनर्जी हे कलकत्ता येथे जन्मलेले चित्रकार, लेखक आणि चित्रपट निर्माते आहेत. त्यांनी फॅटमव्हिल ही कॉमिक्स प्रकाशन संस्था स्थापन केली असून त्यांच्या चित्रकादंबऱ्या भारतातील शहरी जीवनाच्या विखुरलेल्या वास्तवाचे हास्यपूर्ण चित्रण करतात. बर्लिनमध्ये वास्तव्य करणारे बॅनर्जी पोस्ट–कॉलोनियल विषयांवर विटंबनिक शैली वापरतात. चित्रकला महाविद्यालयातील एक प्राध्यापिका डोळ्यांनी ऐका, कानांनी पाहा असे जेंव्हा सांगते तेंव्हा साताऱ्यात आपण चित्र कशी पहावीत यासाठी सर्वांनी साताऱ्याच्या चित्रकारांना बरोबर घेऊन काही प्रयोग सातत्याने केले पाहिजेत. चित्रकार अभिनेते अमोल पालेकर यांनीही रविंद्रनाथ टागोर यांनी त्यांच्या वयाच्या साठीनंतर चित्रे काढायला सुरवात केली. दोन–अडीच वर्षात त्यांच्या चित्रांची संख्या भरपूर झाली होती. शांतीनिकेतनातल्या सर्वांचा आग्रह चालला होता कि, देशातल्या प्रतिष्ठित अशा कलादालनात त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरवावे. विदेशी कलामर्मज्ञ, कलाकार शांतीनिकेतनला भेट द्यायचे तेव्हा तेही रविंद्रनाथांच्या चित्रांच्या जाहीर प्रदर्शनाचा आग्रह धरायचे. पण रविंद्रनाथ यांचा दोन दशकापूर्वीचा गीतांजली हा काव्यसंग्रह नोबेल पारितोषिक मिळाल्यावरच बंगालमध्ये त्याला मान्यता मिळाली असे त्यांना वाटे. त्यामुळे रविंद्रनाय म्हणत ''माझे साहित्य माझ्या देशासाठी आहे आणि माझी चित्रे विदेशासाठी आहेत.'' लंडनच्या ऑक्सफर्ड विद्यापीठाने एका व्याख्यानमालेसाठी त्यांना जेव्हा बोलविले तेव्हा ते चारशे चित्रे काळजीपूर्वक पेट्यात नीट बांधून त्यांनी बरोबर नेली. अनेक वर्षापूर्वी गीतांजली चे हस्तलिखित असेच त्यांनी ब्रिटनला नेले होते. पॅरिसच्या एका प्रतिष्ठित दालनात विजया या त्यांच्या शिष्येने या चित्रांचे प्रदर्शन आयोजित केले आणि पॅरिसमधल्या कलासमीक्षकांनी चित्रांचे कौतुक केले. त्यानंतर भारतामध्ये रविंद्रनाथ टागोर यांची चित्रशैली प्रसिद्ध पावली. पश्चिम बंगालसारखे विविध कलांची प्रदर्शने महाराष्ट्रात ठिकठिकाणी भरवली गेली पाहिजेत ज्यामुळे आपल्याकडे लहानपणा पासूनच ज्या आर्टस या विषयांना महत्व प्राप्त झाले आहे त्याकडे बघण्याचा दृष्टीकोन विकसित होइल.


शिरीश चिटणीस,
सातारा मो. +91 75888 65051

गेल्या पाच वर्षापासून साताऱ्याच्या दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये साताऱ्याच्या चित्रकारांना घेऊन वेगवेगळी चित्र प्रदर्शने आम्ही भरवितो, विजय धुमाळ, पुरुषोत्तम तारू, प्रसाद चव्हाण, एकांक नलवडे, गौरीशंकर कला महाविद्यालय यांनी या हॉलमध्ये वेगवेगळी प्रदर्शने भरवली आहेत. गेल्या महिन्यात चित्रकार स्मिता कोरपे, शिल्पा चिटणीस यांच्या चित्रांचे प्रदर्शन गेल्या महिन्यात भरविण्यात आले होते. चित्रकार कैलास मोहित यांनी गझलांचा व गायक बाळ सुब्रम्हण्यम यांच्या गाण्यांचा कार्यक्रम सतरा अठरा डिसेंबर २०२५ रोजी दीपक शो मी संस्कृती हॉलमध्ये घेतला होता. त्यावेळी त्याने त्याच्या चित्रांचे चित्रप्रदर्शनही ठेवले होते. साताऱ्यात उत्कृष्ट चित्रकार असून त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच आपली चित्रसाक्षरता वाढविण्यासाठी आपण सर्वजण मिळून करूया आणि आपल्या जीवनात आनंदझरा आणुया.

***



## जात्यावरच्या ओव्या......

मावशीच्या गावा
लागे ओलांडाया नदी
नको येऊस भेटाया
बाळा पावसाळ्या मंदी ||४१५||

जाया मावशीच्या गावा
लागे चढाया डोंगर
खाऊन जाय बाळा
एखांदी भाकर ||४१६||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## हरवलेल्या रानवाटा




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

मी त्या माणसाला भेटलो. त्याला ओळख सांगितली. म्हटलं, एके काळी ही आमची शेती होती. इथे त्या कोपऱ्यावर एक चिंचेचे झाड होते. एक छानशी विहीर होती त्याच्याजवळ. पण त्या माणसालाही चिंचेचे झाड आठवेना. काळ सगळ्या खुणा कशा पुसून टाकतो ! त्या विहिरीच्या जागी मात्र एक प्रचंड मोठी विहीर बांधून काढलेली आढळली. तिच्यावर आता पाण्यासाठी इलेक्ट्रिकची मोटर बसवलेली होती. पूर्वी याच विहिरीवर आमची मोट चालायची. ढवळ्यापवळ्याची जोडी मोट ओढायची. पाणी खळाळत बांधातून पिकाकडे धावत जायचं. मोटेच्या चाकाचा कुई कुई असा आवाज यायचा. साधी माणसं या चित्रपटातल्या माळ्याच्या मळ्यामंदी पाटाचं पाणी जातं ... या गीताची आठवण यावी असं ते दृश्य असायचं. पण काळाच्या ओघात सगळंच बदललं !



मग गावात गेलो. दक्षिणेकडून गावात प्रवेश करताना डाव्या बाजूला कोपऱ्यात आमची शाळा होती. एके काळी सुंदर कौलारू असणारी या शाळेचे रंगरूप आज बदललेलं दिसत होतं. आजूबाजूला दोन तीन छोट्या छोट्या खोल्या निर्माण झाल्या होत्या. याच शाळेने मला लहानपणी घडवले होते. तिथे बसून सुरुवातीचे धडे मी गिरवले होते. बालमित्रांना गोष्टी सांगितल्या होत्या. इथेच आम्ही कधी खेळलो होतो, भांडलो होतो. सगळ्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्या. जिथे आमचं घर होतं ती जागा आता उघडीबोडकी पडलेली होती. एके काळी इथेच बालपण गेलं होतं. खूप साऱ्या आठवणी त्या जागेशी निगडित होत्या. पण आता त्या जागेची झालेली अशी अवस्था पाहवत नव्हती. मागेपुढे प्रशस्त आंगण, दोन दारे, लाकडी छत असलेले मातीचे ते प्रसन्न घर खऱ्या अर्थाने मातीला मिळाले होते. त्याची ही अवस्था बघवत नव्हती. गावाच्या बाहेरच्या वेशीजवळ एक मारुतीचे मंदिर होते. मंदिराभोवती एक उंच असा पार होता. मंदिराच्या बाहेर एक मोठे पिंपळाचे झाड होते. गावकऱ्यांनी मंदिर मात्र आता नवीन बांधले होते. उघडा पार जाऊन बंदिस्त आवार निर्माण झाले होते. मंदिराच्या बाहेर असणारा तो प्राचीन पिंपळवृक्षही आता नव्हता. गावकऱ्यांनी त्याच्या जागी पिंपळाचे एक नवीन कलम केलेले झाड लावले होते. ते झाड जणू मला सांगत होते. अरे बदल हा जगाचा स्थायीभाव आहे. या जगात नित्यनूतन अशी एकच गोष्ट आहे आणि ती म्हणजे बदल ! तेव्हा असा निराश होऊ नकोस. जुने जाऊन त्या जागी नवीन येणारच. त्या पिंपळाची हिरवी, सोनेरी, पोपटी पाने वाऱ्यावर सळसळत होती. मला आश्वस्त करीत होती. कुठेतरी रेडिओवर किशोरकुमारचे गाणे ऐकू येत होते, ये जीवन हैं, इस जीवन का यही हैं यही हैं रंगरूप...!

***



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## चतुर्दश ब्रम्हाचा गणेशवंदन

ज्योतिर्मय साहित्य

मनाने सद्गुरू च्या एवढे जवळ पोहचावे की साधकावर सद्गुरूचा आशिर्वाद मिळूनढग जसे पाऊस पाडायचे काम करतात तशाच प्रकारचा आशिर्वाद सद्गुरू कडून मिळतो. फक्त निर्मोही व्रुत्ती असली पाहिजे तरच हे शक्य होते. तो स्वानंद मिळवू शकतो. सद्गुरू हे भवसागर तरून नेणारे तारू आहेत. आत्मज्ञानाच्या सहाय्याने ते तुम्हाला किनाऱ्यावर पोहचवतात.प्रापंचिक अडचणीत मोठमोठ्या भोव-यात अडकलेल्या दीन जीवांनी सद्गुरु वर विश्वास ठेवला तर त्याला सुखरूपपणे बाहेर काढतात. ते काळावर सत्ता चालवतात.सद्गुरू म्हणजे शरण आलेल्या श्रध्दाळू लोकांवर निरतिशय प्रेम करणारी व त्यांना सांभाळणारी माय असते . ती पुत्रवत प्रेम करते. निरतिशय प्रेम करणारी गुरूमाऊली जर प्रसन्न झाली भक्तांना कशाचीही चिंता करण्याची गरज नसते. श्री राम जय राम जय जय राम जय जय रघुवीर समर्थ

आत्मज्ञान नसताना जीवन जगणे म्हणजे आंधळ्याचा बाजार आहे. अज्ञान एक प्रकारची झोप असुन तिच्यामध्ये जीवाला जणू काही प्रपंचाचे स्वप्न पडते. संसार हे एक दीर्घ स्वप्न आहे. या संसारी जगात माझी बायको माझी मुलगी, मुलगा आप्तस्वकीय हे सगळे असतात आपण त्यात गुंतुन पडतो.आपल्याला असलेली संसाराची आसक्ती संपता संपत नाही. आत्मज्ञानाचा सुर्य मावळल्याने ज्ञानाचा प्रकाश नाहीसा झाला. सगळे विश्व अज्ञानरूपी अंधाराने भरून गेले. जीव आतबाहेर अज्ञानाने व्यापून गेला. नाही सत्वरूपाचे चांदणे,नाही ज्ञानाची कवाडे ऊघडी. स्वमग्न अशा अवस्थेत सर्व प्रकारच्या भ्रमाने जीव वेढढून गेल्यावर सर्वत्र अंधार दिसत असताना कुठेही आशा राहिली नसताना फक्त आणि फक्त द्रुष्यचं दिसु लागल्याने व ते सत्य वाटू लागल्याने स्वस्वरूप अनुभवास येईनासे झाले. **(क्रमशः)**

## परमात्म्याचे प्रियत्व आले की जनप्रियत्व येते.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

परमात्म्याने आपल्याला लोककल्याणार्थ सर्व काही शक्ती द्याव्यात, असे काही माणसांना वाटते. पण अमुक एका देहामार्फत लोककल्याण व्हावे अशी इच्छा का असावी ? देहबुद्धी सुटली नाही असाच याचा अर्थ नव्हे का ? शक्ती वापरण्याचे सामर्थ्य आपल्याला आले तर परमात्मा कदाचित् ती देईलही. लहानाच्या हातात तरवार देऊन काय उपयोग ? लोकांनी आपले ऐकावे असे तुम्हांला वाटते; पण अजून क्रोध अनावर आहे, मन ताब्यात नाही, असेही म्हणता ! तर आधी आपल्या विकारांवर, मनावर, छाप बसवा आणि मग लोकांबद्दल विचार करा ! तुम्हांला जनप्रियत्व पाहिजे ना ? मग जनांचा राजा परमात्मा, त्याचे प्रियत्व संपादन करा, म्हणजे जनप्रियत्व आपोआपच येईल. तुम्हांला लोक वाईट दिसतात, पण त्यांना सुधारायला जाऊ नका. तुमच्याच मनात वाईट आहे म्हणून लोक तुम्हांला तसे दिसतात. स्वत:ला आधी सुधारा म्हणजे कुणीही वाईट दिसणार नाही.

लहान मुली बाहुलीबरोबर खेळतात, तिला जेवू घालतात, निजवतात. त्यांना ठाऊक असते की ही निर्जीव आहे, पण भावनेने तिला सजीव कल्पून तिच्याशी त्या खेळतात. तुम्हीही अशी भावना का करीत नाही की, परमात्मा आपल्याशी बोलतो आणि आपणही त्याच्याशी बोलतो ? ही भावना जो जो जास्त दृढ होईल, तो तो खरोखर तो तुमच्याशी बोलू लागेल. मनातून आपले नाते भगवंताशी ठेवावे. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हाती आहे, तर जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात असणार.

आपण सात्त्विक कृत्ये करतो, पण त्यांचा अभिमान बाळगतो. सात्त्विक कृत्ये चांगली खरी, पण त्यात अभिमान ठेवला तर फार वाईट. एक वेळ वाईट कृत्ये परवडली; केव्हा तरी त्यांचा पश्चात्ताप होऊन मुक्तता तरी होईल. पण सात्त्विक कृत्यातला अभिमान कसा निघणार ? मी आप्तइष्टांना मदत केली, आणि आप्तइष्ट म्हणू लागले की, ' यात याने काय केले ? परमात्म्याने त्याला दिले म्हणून त्याने मदत केली ! ' हे ऐकून मला वाईट वाटते ! इथे वास्तविक पाहाता परमात्मा त्यांना आठवला, आणि मी मात्र 'मी दिले' असा अभिमान धरून वाईट वाटून घेतो ! परमात्म्याने त्यांना माझ्या हाताने दिले, हीच सत्य स्थिती असताना मला वाईट वाटण्याचे कारण काय ? म्हणून, परमात्म्याच्या इच्छेने सर्व घडते आहे ही भावना ठेवावी. आपण परमात्म्याजवळ मागावे की, ''तू वाटेल त्या स्थितींत मला ठेव, पण माझे समाधान भंगू देऊ नकोस, माझा मीपणा काढून टाक. तुझा विसर पडू देऊ नकोस. नामामध्ये प्रेम दे आणि तुझ्या चरणी दृढ श्रद्धा सतत टिकू दे.''

आपले जीवन देवाच्या हाती आहे, आणि देव नामाच्या स्वाधीन आहे.

***



## भगवान श्रीकृष्णाची लीला स्थाने

संकलन : मधुकर बोरीकर

## संत श्री नरसिंह मेहता

ज्योतिर्मय साहित्य



ज्या वेळेस आपण पूर्णपणे भगवंतावर विसंबून राहू ,त्यावेळेस तो नक्कीच मदत करतो. ज्याप्रमाणे रांगणारे बाळ त्याला कशाचीही भीती वाटत नाही, तो अग्नी जवळ जातो, तो खाली पडू शकतो. पण न घाबरता ते बाळ रांगत जाते. त्याची संपूर्ण काळजी त्याची आई घेत असते. कारण ते बाळ पूर्णपणे आईवर विसंबलेल असतं. जेव्हा ते बाळ मोठे होतं आणि स्वतः चालायला लागतं तेव्हा आई त्याची, तितकी काळजी करीत नाही. कारण बाळाने स्वतः ची जबाबदारी स्वतःवर घेतलेली असते.

भक्तांचेही असंच आहे ज्या वेळेस तुम्ही पूर्णपणे भगवंताला आपलं जीवन समर्पित कराल. तो भलं करो बुरे करो, ते आनंदाने स्वीकाराल आणि आपली जीवन नौका त्याचे हाती देऊन निर्धास्त व्हाल. त्यावेळेस प्रत्येक पावलाला भगवंत तुम्हाला मदत करील .

नरसिंह मेहता यांची अत्यंत गरीबी होती. त्यांची भक्त म्हणून कीर्ती दिगंत पसरली होती पण त्यांचे दारिद्र्य हे वास्तव होते. काही पाखंडी लोकांना त्यांची थट्टा करायची, त्यांना हिणवायचे याची खूप आवड होती. एकदा एक मदनदास नावाचा ब्राह्मण त्याच्या मुलीसाठी वर संशोधन करण्यासाठी फिरत होता. अशाच एका टिंगलखोर माणसाशी त्याची गाठ पडली, आणि त्याने माझ्या मुलीसाठी कोणते चांगले स्थळ आहे काय? अशी त्या टिंगल खोरा जवळ विचारणा केली. तेव्हा त्या टिंगल खोर माणसाने, नरसी मेहता यांचा मुलगा शामलदास याचे स्थळ त्यांना सुचविले. त्याला असे वाटले की नरसी मेहता तर दरिद्री आहे. हा मदन मेहता त्याच्या घरी स्थळ घेऊन गेला तरी याचं दारिद्र्य पाहून उलट नरसी यांचीच बदनामी करील आणि आपल्याला मजा पाहायला मिळेल. पण प्रत्यक्षात मदन मेहता ने नरसी मेहता यांच्या घरातील पवित्र आणि भक्तीमय वातावरण पाहिलं, आणि त्याने त्याच क्षणी, आपली मुलगी शामलदास या मुलाला देण्याचा निश्चय केला. लग्न ठरले, तिथी निश्चित झाली.

आता नरसी मेहता वऱ्हाड घेऊन कसे जाणार ?असे त्या टिंगल खोऱ्याला वाटले. मदन मोहन यांच्या गावी वऱ्हाड जाणार होते. आणि गरीब नरसी मेहताचे परिवार यावेळेस तरी उघडा पडेल, त्याची फाटलेली वस्त्रे हे लोकांना हसण्यास भरपूर वाव मिळेल, असे समजून टिंगलखोर वाट पाहत होता.

नरसिंह मेहतांनी लग्नाचे निश्चिती झाली ,तिथी ठरली की सर्वप्रथम निमंत्रण भगवान श्रीकृष्णाला दिले. आणि खूप तळमळीने आणि अर्जवाने प्रभूस विनंती केली की. त्यांनी या लग्नात सम्मिलित व्हावे. प्रभू तुम्ही थोर, या गरीबाच्या घरच्या लग्नाला तुम्ही आलेच पाहिजे. मी तुमचे बाळ आहे. माझ्या घरच्या लग्नाला तुम्ही न येऊन कसे चालेल ?अशी आग्रहाची वारंवार विनंती केली. आणि तो लग्नाच्या तयारीला लागला. मदन मोहन यांच्या गावाकडे वऱ्हाड रवाना झाले. टिंगलखोर आता हे वऱ्हाड करी कसे दिसतात? आणि आपल्याला कशी मजा पाहायला मिळते,यांना कसे हिणवता येते, अशी वाट पाहून होता. वऱ्हाड त्या गावी गेले ज्या लग्नात प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण समिलीत झाले ते वऱ्हाड कसे असेल? टिंगल खोराची पाहून तर वाचाच बंद पडली. सर्वच वराडकरीच्या अंगावर भरजरी वस्त्रे, मोठमोठे सोन्याचे अलंकार, आणि सर्वत्र थाट दिसून येत होता. भगवान श्रीकृष्ण ज्या वऱ्हाडात संमिलीत आहेत तिथे दारिद्र्य कोठून दिसणार? भगवंताने ज्याला आपला मानले, त्याला भगवंत दारिद्र्यात कसे ठेवतील? **(क्रमशः)**




## तुमचा मूड अचानक चढ-उतार होतोय? कदाचित व्हिटॅमिन डी कमी आहे!

ज्योतिर्मय साहित्य

चिडचिड वाढलेली वाटते
एकटं, उदास वाटणं
खरंतर काही त्रास नाही, पण ''बरे वाटत नाही''
तर एकदा व्हिटॅमिन डी टेस्ट करून पाहा
शरीर सांगत असतं, पण आपण ऐकत नाही!
मग उपाय काय?
सकाळी २०-३० मिनिटं उन्हात बसा
शक्यतो ८:३० च्या आधीचा सूर्यप्रकाश मिळवा.
डॉक्टरांच्या सल्ल्याने व्हिटॅमिन डी सप्लिमेंट घ्या
टेस्ट केल्याशिवाय अंदाजाने घेऊ नका.
फॅटयुक्त नैसर्गिक अन्न खा:
जसे लोणी, तूप, दूध, बदाम, बिया (फ्लॅक्स, सनफ्लॉवर)
मन शांत ठेवण्यासाठी ध्यान / ब्रेथिंग एक्सरसाईस करा
जे मूड सुधारायला मदत करतं.
''मन, शरीर, आणि सूर्य या तिघांचं एक खास नातं आहे''
मनाला मोकळं ठेवायचं असेल, तर शरीरात सगळ्या नुट्रीऐंट्स असाव्या लागतात.
व्हिटॅमिन डी हा त्यातला एक महत्त्वाचा सोल्जर आहे.

म्हातारपण लवकर नको?
तारुण्य टिकवण्यासाठी हे उपाय नक्की करा!
तरुणांनाच काय, वयोवृद्धांनाही चिरतरुण राहायचं असतं. पण त्यासाठी काही गोष्टी नियमित केल्या तर वाढतं वय थांबवता येतं.
खाली दिलेले उपाय आयुष्यात अमृतासारखे ठरू शकतात.
शरीराला शुद्ध ऑक्सिजन मिळू द्या!
-दीर्घ श्वसन करा, प्राणायाम करा
-फुफ्फुसं मजबूत राहतील, पेशींना नवी ऊर्जा मिळेल
-म्हातारपण दूर राहील
''प्रत्येक पेशीला ऑक्सिजन दिला, की शरीर झाडासारखं टवटवीत राहतं!''

दिवसात ३ वेळा अंघोळ करा
अंगाला, आत्म्याला आणि मनाला.
-अंघोळीने केवळ शरीरच नाही, तर मनही प्रसन्न राहतं
-ऊर्जेचा नवा झरा उघडतो
-प्रदूषण, धूळ, वाईट स्पर्श सगळं धुवून निघतं
''अंघोळीमुळे फक्त शरीर नाही, मनही उजळतं!''
योग्य वेळी आहार घ्या आणि तेल-तूप वापरा
-भरपेट खा पण वेळेवर
-केसात, डोळ्यात, कानात तेल वापरा
-तेल लावून सूर्यनमस्कार करा बघा कसं शरीर झळाळतं
''जेवणात वेळ, आहारात तूप आणि जीवनात शिस्त हीच तरुणपणाची गुरुकिल्ली आहे!''
दररोज १५ मिनिटं स्वतःशी जोडा ध्यानधारणा करा
-''सृष्टी माझ्यासाठी आहे'' हा विचार
-मनात सकारात्मकता, चेहऱ्यावर तेज
''ज्याचं मन शांत, त्याचं शरीरही दीर्घकाळ शांत राहतं!''
झोप म्हणजे रिचार्ज ती घ्या प्रेमाने!
-रात्रीची झोप = सकाळचा उत्साह
-झोपेमुळे शरीर भरून निघतं
-मानसिक आरोग्यही टिकतं
''जेव्हा तुम्ही झोपता, तेव्हा तुमचं शरीर काम करतं त्याला ती संधी द्या!''

***

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

*♦स्वार्थी मांजर♦*

*एका मांजराने आपल्या मालकाचा आवडता पोपट मारून खाल्ला. तेव्हा मालकाने, 'ते मांजर दिसले तर मारून टाकीन' असे रागाने म्हटले. ते ऐकताच मांजर इतके घाबरले की ह्या प्रसंगातून देवाने आपल्याला वाचविले तर पुढे आपण कोणताही पक्षी कधीही मारून खाणार नाही अशी प्रतिज्ञा केली. थोड्या वेळाने दिवाणखाण्याच्या खिडकीतून एक वटवाघूळ अचानक आत आले ते पाहून असल्या मोह उत्पन्न करणाऱ्या प्रसंगी कोणत्या प्रकारचे वर्तन करावे हा प्रश्न मांजराला पडला. एकीकडे भूक व दुसरीकडे प्रतिज्ञाभंग होण्याची भिती अशा पेचात ते सापडले असता काही वेळाने आपली भूक भागविण्याची एक युक्ती त्याला आढळून आली. वटवाघूळाकडे पाहून ते आपल्याशीच म्हणाले, 'हा पक्षी आहे असं जर मानलं तर केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणे याला हात लावण्याचा अधिकार मला नाही, पण याच्या तोंडाचं उंदराच्या तोंडाशी इतकं साम्य आहे की, याला मारून खाण्याचा अधिकार मला आहे. इतके बोलून तिने त्या वटवाघूळाला खाऊन टाकले.*

*तात्पर्य- स्वार्थ साधण्याची वेळ आली असता लबाड लोक आपली प्रतिज्ञा युक्तीने गुंडाळून ठेवतात.*

# भावविभोर आत्मरंग

ज्योतिर्मय साहित्य

'एकसोबीस हरीपत्ती लौंग आणि मी' संगीता अरबुने यांचा हा ललित लेखसंग्रह म्हणजे आत्मकथन, व्यक्तीचित्रण, स्थलवर्णन यांचं सुखद रसायन आहे. तरीही हे आत्मचरित्र नव्हे पण आयुष्यात आलेल्या खऱ्याखुऱ्या जीवंत माणसांच्या आठवणी उजळताना लेखिकेने स्वतःच्या आयुष्यात उत्कटतेने डोकावून भूतकाळाला 'तिळा उघड' म्हटले आहे त्यातून वाचकांच्या हाती लागते ती अनोख्या अनुभवांची, तिच्या आठवणीत रुतून बसलेल्या अनेक जिवलग माणसांची भावजडीत रत्ने.

'थोडं मनातलं' सांगताना संगीता अरबुने म्हणतात, 'हे सगळं लिहिता लिहिता मनाचा तळ नकळतपणे लख्ख होत गेला आणि माझ्यातली मी मला अधिक ठळकपणे गवसत गेले' पृ. ७ ही गवसत गेलेली मी या संग्रहातील प्रत्येक लेखात वाचकांनाही गवसत जाते. या पुस्तकात अशी मी ला घडविणारी तिच्या आयुष्यात आलेली अनेक माणसं आहेत. त्यासाठी पुस्तकाचं शीर्षकच असलेला लेख वानोळा म्हणून पाहता येईल. तो तात्यांवर आहे, हे तिच्या आईचे वडील. बालपणीच आई गेल्यावर या दोन बहिणी आईच्या आई-वडिलांकडे म्हणजे आजी-आजोबांकडे रूजतात. आजोबा पोलिसातील नोकरीतून निवृत्त झाल्यावर संसाराचा गाडा रेटण्यासाठी पानपट्टीचे दुकान टाकतात. बाजारच्या दिवशी ते जेवणासाठी घरी येत तेव्हा मधल्या वेळात या बहिणींना तेथे बसावे लागे. वयाची जाण आल्यावर लेखिकेला तिथे बसणे रुचेना. त्यासाठी तिचं कुरबुर करणं, अबोल अजान प्रतिकार करणं, आणि मग एक अनोखी पळवाट शोधणं. त्या सोबतच तात्यांचा स्वभाव, घरासाठीची त्यांची तळमळ, धडपड त्यांची अपरिहार्यता आणि त्यांनी लपवलेल्या भावना... आर्दीची रूपं इतकी लोभस आहेत की ती एक स्वतंत्र कथाच ठरते. बाप लेकी नावाच्या पुस्तकात प्रिया तेंडुलकरने विजय तेंडुलकरांवर म्हणजे वडिलांवर लिहिताना असं म्हटलं आहे की, 'आईची ममता म्हणतात तशी बाबांची 'बबता' का नाही म्हणत! हा लेख वाचताना याची फार तीव्रतेने आठवण होते. या संग्रहातील तात्यांची ही बबता वाचकांच्या जिव्हारी लागते. पानाचा ठसका लागावा तशी!


संगीता सुहास अरबुने, वसई (पूर्व) मो. ८०८०२३३९६३

केवळ तात्याच नाही तर आजी, पळून जाऊन परधर्मीयाबरोबर लग्न केलेली सुलोचना मावशी, पुढे सासरी कामाला येणारी अन कुष्ठरोग झालेली चित्रा, 'ज्याच्याशी एक हळुवार नातं उमलतानाच संपलं तो 'प्रिय' या लेखातला तिचा शाळा सोबती, सासरमाहेराची अशी कितीतरी माणसं आठवणींच्या उंबरठ्यावर आतबाहेर वावरत राहतात, नवरा मुली अगदी तिच्या कोंबड्या आणि तिचं स्वतःचं घर सुद्धा. ग्रेस यांच्या ओळींना स्मरून म्हणायचे तर अरबुने यांचे हे आत्मकथन म्हणजे प्रत्येक लेखात असंख्य आठवणींनी अगदी गच्च भरून आलेलं आहे. 'शेतावर ढग अडलेला घे त्याला मागून पाणी' (ग्रेस) अगदी तसे त्यांच्या आठवणींचे गडद जलद ओथंबून आलेत. त्याही मग जीवन (पाणी) मागतात. किंबहुना ते आपसूक येते. त्यात सहजता आहे, चिंतन आहे, मी पण आहे म्हणून बाई पणही आहे. मुख्य म्हणजे खरे पण आहे हेच वाचकाला भावते.

या खरेपणामुळेच लेखिका आपले विचार वागणं तपासून पाहते परधर्मीयाशी लग्न केलेल्या मावशीविषयी वर्तमानात काहीच बंध राहत नाही. हे सांगताना तिला प्रश्न पडतो ' नीट लक्षात नाही, की लक्षात ठेवावंसच वाटलं नाही'!.'...'ज्या ठिकाणी माझी मावशी आहे तिथपर्यंत मला पोहोचताच येत नाहीय'.(पृ ६१) किंवा काही अनुभव अगदी कोंबड्या पाळायचे सुद्धा तिला आत्मचिंतन करायला लावतात. ती म्हणते '' ...की वयासोबतच निर्ढावलेपण आलं होतं माझ्यात! कायकी! (पृ १११). हा संदर्भ जागला तसं लक्षात आलं हा 'कायकी' शब्दही प्रश्नांच्या उत्तरासाठी हात वर करणारी बोलीभाषेची पताका आहे. ही बोलीभाषा, त्यातील संवाद, प्रसंगानुरूप वर्णने, गावंढळ असणारे/ वाटणारे जगण्याचे शहाणपण हे या लेखनाचे अस्सलपण आहे.

हे अस्सल पण आहे म्हणूनच गावातली हागणदारी ही 'न सांगण्याची गोष्ट'ही इथे सविस्तर आणि स्वसंदर्भात सांगितली आहे. यातलं गावकऱ्यांना अन गावाला पालखीच्या वेळी सोसावं लागणार जगणं वाचकांनाही विचार करायला लावतं. पोरकेपण, गरिबी, आई नसलेली म्हणून सासरी झालेली थोडीफार अवहेलना एवढेच इथे नाही तर आजी-आजोबांची माया आहे नवऱ्याची समंजस साथ आहे, सासरी हलके हलके येणाऱ्या समृद्धीत हलकेच येणाऱ्या लिखाणाची दाद आहे. गावकूस आणि शहरातील अनुभवांचे गच्च तितकेच जगण्याने भरीव झालेले गाठोडे आहे. हे 'बासन' जरी संगीता अरबुने आपल्या लिखाणातून सोडत गेल्या तरी तो लेखिका म्हणून जगण्याचा त्यांचा आयुष्यभराचा ठेवा आहे.

सुहासिनी किर्तीकर

एकसोबीस हरीपत्ती लौंग आणि मी

ललित लेखसंग्रह

प्रकाशक : शब्दालय प्रकाशन

मुखपृष्ठ : सरदार जाधव

पृष्ठसंख्या : १५० किंमत : ३०० रुपये




## पिठापुरम

ज्योतिर्मय साहित्य



श्रीपाद श्रीवल्लभ मंदिर

पिठापूर येथील महत्त्वाचे स्थान म्हणजे श्रीपाद श्रीवल्लभ यांचे मंदिर.इसवी सन १३२० मध्ये श्रीपाद श्रीवल्लभ यांचा जन्म, त्यांच्या आजोळी, ज्या घरात झाला त्याच जागेवर आज हे पवित्र मंदिर उभे आहे. इथे श्रीपाद श्रीवल्लभांच्या दिव्य पादुका तसेच दत्तप्रभू, श्रीपाद श्रीवल्लभ, आणि श्री नरसिंह सरस्वती या तिघांच्या तेजस्वी मूर्त्या स्थापित केल्या गेल्या आहेत. या मंदिरात प्रवेश केल्याबरोबर भारल्या सारखे होते. इथे दिव्यत्वाची जाणीव क्षणाक्षणाला होते व त्या दिव्य पादुकांचे दर्शन घेऊन कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. या मंदिरात सकाळी रुद्राभिषेक आपणास करता येतो. पुजारी वर्ग आपला गोत्र व नावाचा उच्चार करून आपणा तर्फे संकल्प सोडवतात. नंतर ते सविस्तर पादुकांचा रुद्राभिषेक करतात.अनेक भक्त मंदिरात बसून गुरुचरित्र या दिव्य ग्रंथाचे पारायण करतात.मंदिराचे प्रांगणात औदुंबराचे झाड आहे.औदुंबर हा पवित्र वृक्ष आहे. त्याच्या तळाशी दत्तप्रभूंचा नित्य वांस असतो.मंदिरातील हा वृक्ष तर साक्षात श्रीपाद श्रीवल्लभ यांचे सानिध्य लाभलेला आहे.भक्त आपल्या कौटुंबिक अडचणी,व्यथा या औदुंबरास सांगतात व नवस बोलून साकडे घालतात.नवस फेडण्यासाठी लोक या वृक्षास नारळाची माळ अर्पण करतात व प्रदक्षिणा घालतात. संध्याकाळी सात वाजता श्रीपादांच्या दिव्य पादुका आणि मूर्ती यांची पालखी मिरवणूक असते. दोन पालख्यात स्थापित केलेल्या या दिव्य पादुका व मूर्ती यांची पालखी, भक्तांद्वारे मंदिराभोवती फिरवली जाते. या काळात रूद्राचे पठण व भजन या दिव्य घोषात पालख्या तीन वेळेस मंदिराभोवती फिरवल्या जातात. एकूण २४ लोकांना या पालखीची सेवा करता येते

पालखी सेवा करताना त्याची तिकीट विक्री सकाळी ११ वाजता सुरू होते व लगेचच २४ लोक झाले की बंद होते.

आजही श्रीपाद श्रीवल्लभ हे दिव्य ज्योती स्वरूपात तिथे विद्यमान आहेत. व ते निस्सीम भक्तांना दर्शन देतात व त्यांचा अध्यात्मिक उत्कर्ष करतात असा अनेकांचा अनुभव आहे.

(क्रमशः)

# लग्नाच्या मंडपात डोक्याला शॉट; प्रियदर्शिनी इंदलकर- अभिजीत आमकर यांची फ्रेश जोडी झळकणार 'लग्नाचा शॉट'मध्ये

ज्योतिर्मय साहित्य

मराठी चित्रपटसृष्टीत चर्चेत असलेल्या 'लग्नाचा शॉट' या आगामी चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून याच पोस्टरमधून चित्रपटातील प्रमुख कलाकारही समोर आले आहेत. या चित्रपटात प्रियदर्शिनी इंदलकर आणि अभिजीत आमकर यांच्या प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. याआधी केवळ संकल्पना आणि शीर्षकामुळे उत्सुकता निर्माण करणाऱ्या या चित्रपटाने आता पोस्टरद्वारे थेट लक्ष वेधून घेतले आहे.

या पोस्टरमध्ये पारंपरिक लग्नाच्या वेशभूषेत दिसणारा नायक-नायिका जोडीने उभे असून, दोघांच्याही चेहऱ्यावर गोंधळलेले, प्रश्नार्थक भाव दिसतात. डोक्याला बंदूकसारखी बोटं लावलेली ही देहबोली पाहाता, लग्नाच्या धावपळीत काहीतरी मोठा घोळ होणार असल्याची स्पष्ट झलक पोस्टरमधून दिसतेय.

पोस्टरच्या पार्श्वभूमीत रेल्वे, बस, वळणावळणाचा रस्ता आणि राशीचक्र अशा दृश्यात्मक घटकांचा वापर करण्यात आला आहे. त्यात 'लग्नाअगोदरही लग्नानंतरही' असे शब्दही दिसत आहेत. यामुळे प्रवास, वेळेचा गोंधळ, चुकीचे निर्णय आणि नशिबाचे फेरे यांचा कथेशी असलेला संबंध सूचकपणे समोर येतो. संपूर्ण पोस्टर रंगीबेरंगी, उत्साही आणि गंमतीशीर वातावरण निर्माण करत असून, चित्रपटाचा हलकाफुलका आणि मनोरंजक सूर स्पष्ट करतो.

या पोस्टरबाबत बोलताना दिग्दर्शक अक्षय गोरे म्हणतात, 'लग्नाचा शॉट' ही लग्नाच्या गोंधळाकडे मजेशीर नजरेने पाहाणारी गोष्ट आहे. कोणताही गंभीर संदेश देण्याचा अट्टहास न ठेवता, संपूर्ण कुटुंब एकत्र बसून पाहू शकेल असा निव्वळ मनोरंजनाचा अनुभव आम्ही देण्याचा प्रयत्न केला आहे. हलकंफुलकं, स्वच्छ आणि प्रामाणिक मनोरंजन हेच या चित्रपटाचं खरं बलस्थान आहे.

महापर्व फिल्म्स निर्मित आणि जिजा फिल्म्स यांच्या सहयोगाने साकारलेल्या 'लग्नाचा शॉट' या चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन अक्षय गोरे यांनी केले आहे. गीत, संगीताची धुरा प्रवीण कोळी आणि योगिता कोळी यांनी सांभाळली आहे. तर अक्षय महादेव गोरे, विजय महादेव गोरे, अभिषेक उत्कर्ष कोळी, सुरेश मगनलाल प्रजापती या चित्रपटाचे निर्माते आहेत. ६ फेब्रुवारी रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




# भारतीय गणित परंपरा

ज्योतिर्मय साहित्य




भारतीय गणित परंपरा ही केवळ आकडेमोडीपुरती मर्यादित नसून ती मानवी बुद्धी, तर्कशक्ती आणि जीवनदृष्टीचा उत्कृष्ट आविष्कार आहे. जगाला शून्य (०) देणारी संस्कृती म्हणून भारताचे नाव गणिताच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. आज आधुनिक विज्ञान, संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान ज्या पायावर उभे आहे, त्यामागे भारतीय गणितीय विचारांचा मोठा वाटा आहे.

प्राचीन भारतात गणिताचा विकास वेद, वेदांग, शुल्बसूत्रे, आर्यभटीय, लीलावती अशा विविध ग्रंथांमधून झाला. यज्ञवेदीची रचना, मंदिर स्थापत्य, खगोलशास्त्र, पंचांगनिर्मिती, व्यापार-व्यवहारया सर्व क्षेत्रांत गणिताचा अत्यंत व्यावहारिक आणि सखोल उपयोग केला गेला. त्यामुळे भारतीय गणित हे केवळ सैद्धांतिक नसून जीवनाशी निगडित शास्त्र होते.


विद्यावाचस्पती चन्द्रहास दुर्गादासशास्त्री सोनपेठकर

भारतीय गणितज्ञांनी दशमान पद्धत, वर्गमूळ-घनमूळ, त्रिकोणमिती, बीजगणित, समीकरणे आणि अनंततेच्या संकल्पना अत्यंत प्रभावीपणे मांडल्या. विशेष म्हणजे हे सर्व ज्ञान स्मरणसुलभ सूत्ररूपात किंवा श्लोकरूपात दिले गेले, जे आजही 'वैदिक गणित' म्हणून ओळखले जाते. कमी वेळेत, अचूक उत्तर देणारी ही पद्धत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि विचारक्षमता वाढवते.

आजच्या काळात, जेव्हा शिक्षण अधिकाधिक परीक्षाभिमुख आणि यांत्रिक होत चालले आहे, तेव्हा भारतीय गणित परंपरेचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. ही परंपरा विद्यार्थ्यांमध्ये तर्क, सर्जनशीलता, एकाग्रता आणि आनंददायी अध्ययन घडवते. २०२० च्या पार्श्वभूमीवर भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश शिक्षणात करणे ही काळाची गरज आहे.

वैदिक गणित ही भारतीय ज्ञानपरंपरेतील एक वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रभावी गणितीय पद्धत आहे. ही पद्धत सूत्रांवर आधारित असून गणितीय क्रिया अत्यंत सोप्या, जलद आणि स्मरणसुलभ रीतीने करण्यावर भर देते. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, घन, समीकरणे इत्यादी संकल्पना वैदिक गणितात सूत्ररूपाने मांडल्या असल्यामुळे विद्यार्थ्यांची गणिताची भीती कमी होते आणि तर्कशक्ती, एकाग्रता व आत्मविश्वास वाढतो. कमी वेळेत अचूक उत्तर मिळविण्याची क्षमता विकसित करणारे वैदिक गणित हे केवळ गणना कौशल्य वाढविणारे नसून सर्जनशील आणि आनंददायी अध्ययनाची दिशा देणारे महत्त्वाचे साधन आहे.

भारतीय गणित परंपरा म्हणजे केवळ भूतकाळाचा गौरव नव्हे, तर भविष्यासाठीची दिशादर्शक दीपशिखा आहे. आपल्या शिक्षणपद्धतीत या परंपरेला योग्य स्थान दिल्यास, गणित भीतीचे नव्हे तर आनंदाचे आणि आत्मविकासाचे साधन ठरू शकते.

(लेखक भारतीय ज्ञान परंपरेचे अभ्यासक आहेत. )



# पापा हे पुस्तक प्रत्येक जबाबदार कुटुंबियांसाठी मार्गदर्शक - डॉ अभय सुभेदार

श्री गिरीश वसेकर यांचा पापा हा किशोर लेख संग्रह वाचला. पापा हा किशोर लेख संग्रह, वाचक वाचन करताना निश्चितपणे अंतर्मुख होतो. या पुस्तकाबद्दल, माझा अभिप्राय येथे कळवत आहे. ''पापा'' हे पुस्तक (किशोर लेख संग्रह) पालक आणि पाल्य यांच्यातील नात्याचे सूक्ष्म, संवेदनशील आणि अत्यंत महत्त्वाचे पैलू उलगडणारे आहे.

आजच्या बदलत्या काळात संवाद, विश्वास, मूल्ये आणि भावनिक जडणघडण किती आवश्यक आहे? याची जाणीव हे पुस्तक अतिशय सहजतेने, सुंदररीत्या करून देते.

लेखकाने साध्या भाषेत, पण प्रभावी उदाहरणांद्वारे, पालकमुलांचे संबंध अधिक समजून घेण्यास आणि मजबूत करण्यास मदत केली आहे. पापा हे पुस्तक केवळ पालकांसाठीच नव्हे तर प्रत्येक जबाबदार कुटुंबियांसाठी मार्गदर्शक ठरावे, असे आहे. वाचकाला अंतर्मुख करून नातेसंबंध अधिक प्रेमळ, समर्थ आणि सकारात्मक कसे बनवायचे ? याचा विचार करायला लावणारे हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

तसेच हे पुस्तक वाचल्यावर मला असे लक्षात आले की शाळांमधून वाचन संस्कार/संस्कृती हा उपक्रम पुढे नेण्यास पापा हे पुस्तक प्रत्येक मराठी शाळेत निश्चित उपयुक्त ठरावे. श्री गिरीश वसेकर यांचे स्वतःचे असे पहिलेच पुस्तक असूनही ते अत्यंत सुंदर झाले आहे. हे पुस्तक प्रत्येक पालकांनी, बालकांनी आणि प्रत्येक मराठी व्यक्तीने वाचलेच पाहिजे असे मला मनातून वाटते.

या बदलत्या आधुनिक काळात बालकावर अखंड संस्कार व्हावे आणि भविष्यात एक चांगली पिढी घडावी यासाठी लेखकाची धडपड आणि तळमळ, यातून दिसून येते. श्री गिरीश वसेकर यांचे, पापा या पुस्तकाबद्दल खूप मनपुर्वक अभिनंदन आणि भविष्यात आणखी विविध विषयावर वाचनीय पुस्तके प्रकाशित व्हावीत या साठी खूप शुभेच्छा.






# अष्टदीप - भारतरत्नांच्या व्यक्तिमत्वाचा वेध

ज्योतिर्मय साहित्य

सदर पुस्तकात आठ प्रेरणादायी भारतरत्नांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेतला आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ श्री प्रथमेश नाझरकर यांनी केले आहे ते अत्यंत समर्पक व आकर्षक आहे ते बघितल्यावर लहानपणीचे थोरांची ओळख व लहान पुस्तकांची चरित्रमाला आठवते. पण या पुस्तकात अत्यंत अभ्यासपूर्ण व सखोल माहिती समजते. लेखकाची भाषाशैली सोपी, सरळ, सुटसुटीत व ओघवती आणि आबालवृद्ध सर्वांना आकलनास अत्यंत सोपी आहे. ती वाचकांना आपलेसे करणारी आहे. वाचक त्यात रंगून जातात.

पुस्तकाच्या अनुक्रमणिकेत आठ भारतरत्नांची नावे त्यांच्या व्यक्तिमत्वातील वैशिष्ठयांसह दिसतात.

त्या नंतर आपण लेखकाचे मनोगत वाचू शकतो. खरे तर बरेचदा मनोगत, प्रस्तावना वाचले जात नाही. परंतु मनोगताची सुरुवात ''आपला भारत देश म्हणजे नररत्नांची खाण आहे. हे वाक्य पुढचे मनोगत वाचण्याची उत्सुकता वाढवते. हे मनोगत काही संस्कार देते व लेखकाच्या वाचन, लेखन याचा प्रेरणास्त्रोत सांगते.

अष्ट म्हणजे आठ. या आठ महान व्यक्तिंनी दिव्याप्रमाणे उजळून, वाती प्रमाणे जळून निस्वार्थीपणे भारताला उजळून प्रकाशमान करून टाकले. लेखकाच्या भाषेत सांगायचे तर, या सर्वांना आपल्या आयुष्यात अत्यंत विपरीत परिस्थितीचा सामना करावा लागला. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली नैतिक मूल्ये ढळू दिली नाहीत. किंवा ते निराश झाले नाहीत. हे वर्णन करताना पुढील समर्पक काव्यपंक्ती योजल्या आहेत. ''आली जरी कष्टदशा अपार न टाकीती धैर्य तथापि थोर। त्यामुळे हे मनोगत वास्तव व रंजक झाले आहे.

हे पुस्तक म्हणजे फक्त जन्म, मृत्यू व त्रोटक कार्य सांगणारे साधारण चरित्र किंवा निबंध नाही. तर आठ भारतरत्नांच्या चरित्राचा अभ्यास करून त्यात आपले विचार जोडून व्याक्तिंकडून वाचकांनी काय घ्यावे, त्यांचे आदर्श कसे रूजवावेत हे सगळे सहज सांगावे अशा ओघवत्या शैलीत सुचवले आहे. लेखकाची शब्द क्षमता, लेखणी सामर्थ बघून ते सिद्धहस्त लेखक अहेत हे जाणवते. या आठ भारत रत्नांना जी अर्थपूर्ण विशेषणे वापरली आहेत त्यातून हे लक्षात येते.

मनोगता नंतर प्रेरणादायी व संस्कारक्षम पुस्तक हे पुस्तका विषयी विशेष माहीती देणारे श्री. लक्ष्मीकांत देशमुख लेखक व माजी संमेलनाध्यक्ष यांचे विचार वाचायला मिळतात. हा लेख अतिशय वाचनिय व पुस्तकाचे यथार्थ महत्व विशद करणारा आहे. या नंतर आपल्या समोर अतिशय महत्वाची माहिती सांगणारा लेख येतो. तो म्हणजे भारतरत्न पुरस्काराविषयी थोडेसे हे सगळे लेख मुख्य पुस्तक वाचण्याची प्रेरणा देतात. व उत्सुकता वाढवतात. यात प्रत्येक व्यक्तिचे नाव त्यांच्या मुख्य वैशिष्ठयासह वाचायला मिळते. प्रथम आपल्या भेटीला येतात - निश्चयाचा महामेरु महर्षी धोंडो केशव कर्वे.

लेखाचे नाव वाचताच लक्षात येते, अतिशय प्रतिकुल परिस्थितीत अचल निश्चय असणारे व ठाम ध्येय ठेवून काम करणारे व्यक्तिमत्व. त्यांनी विधवांचे पुनरुत्थान करून व स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांना जगात वेगळेच स्थान मिळवून दिले आहे. या काळात समाजाचा झंझावातरूपी विरोध सहन करून हे कार्य करणे, या साठी ठाम निश्चयाचा अचल महामेरूच पाहीजे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत सुरु झालेली छोटी संस्था आज मोठ्या वटवृक्षात रुपांतरीत होऊन अनेक महिलांना सक्षम बनवून त्यांना समाजात ठामपणे उभे करत आहे. त्यांचे हे कार्य लेखकाने इतके प्रभावीपणे मांडले आहे, की त्या काळातील परिस्थतीची वास्तवता लक्षात येते आणि आपण नतमस्तक होतो.

या नंतर बालपणीच देशाचा विचार करणारे, हित जपणारे द्रष्टा अभियंता सर विश्वेश्वरैया यांचे चरित्र समोर येते. यांना लहानपणी मामाकडे राहून शिक्षण पूर्ण करावे लागले. पण हुशारीच्या आड कोणत्याही गोष्टी येत नाहीत. याच बालवयात धबधबा बघताना त्यांची प्रतिक्रिया इतर मुलांप्रमाणे नव्हती. तर या द्रष्ट्या बालकाच्या मनात असा विचार होता, ''केवढा हा पाण्याचा व शक्तीचा अपव्यय, याचा काही उपयोग नाही का करता येणार? मोठा झाल्यावर मी नक्कीच काहीतरी करणार,'' आणि हाच विचार त्यांनी मोठेपणी अंमलात आणला. व आपल्या कार्य कर्तृत्वाने पाणी, बंधारे, कालवे यावर प्रयोग व संशोधन केले. जे आजही आपल्याला उपयोगी पडत आहेत. आणि त्यांना काही पर्याय नाहीत. त्यांची शिस्त, वक्तशीरपणा विविध कार्य, त्यांच्या काही इमारती, वृंदावन गार्डन या विषयी अत्यंत आदरपूर्वक लिहीले आहे.



पुढे आपण भेटतो ते भारत एकसंध करण्याच्या कामी अत्यंत मोलाची कामगिरी करणारे- लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना. यांच्या कार्याचा व लोहपुरुष या विशेषणाचा अत्यंत सखोल अभ्यास करून कार्यपट समोर ठेवला आहे.

५६५ संस्थाने किती प्रयत्न पूर्वक आपल्या बुध्दिमत्तेने एका छताखाली आणली व त्या साठी काय काय करावे लागले, याचे अगदी बारकाईने वर्णन वाचायला मिळते. म्हणूनच ते भारताचे लोहपुरूष या नावाने ओळखले जातात. भारताची एकता व अखंडता या साठी अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. हे सगळे वाचताना या लोहपुरुषाचे प्रयत्न, विचार यांचे समग्र दर्शन घडते. व हे व्यक्तिमत्व नसते तर काय घडले असते या विचाराने आपला थरकाप उडतो. हे सगळे वाचताना आपण किचकट इतिहास वाचत आहोत असे कुठेही वाटत नाही. यातच लेखकाच्या लेखणीचे व अवघड विषय सोपा करून सांगण्याचे कसब लक्षात येते.

उद्‌योगपती जे आर डी टाटा यांचे वर्णन करताना लेखक. ओबड धोबड दगडातून मूर्ती घडवणारा शिल्पकार, हिऱ्याला पैलू पाडणारा जवाहिर असे शब्द वापरतात. भारतात साखरे प्रमाणे विरघळून जाणे इथपासून टाटांचे खरे देशप्रेम व कार्य याची माहिती मिळते. यांचे चरित्र म्हणजे रत्नांची खाणच! असे वर्णन लेखक करतात. द्रष्टा उद्योगपती आपल्याला सोदाहरण वाचायला मिळतो. त्याच बरोबर सच्चा देशभक्त, गुणी माणसांची कदर, पारख असणारा, अनेक उद्‌योगांची टाटा समूहात भर घालणारा, माणसांचे गुण हेरुन त्यांचे व्यक्तिमत्व घडवणारा माणूस हळवा व कुटुंबवत्सल होता हे या लेखातून समजते. यानंतर आपण भेटतो जशा व्यक्तिला, ज्यांची घोषणा लहानपणी पासून सगळीकडे देतो ती म्हणजे जय जवान जय किसान, ते म्हणजे निर्मळ चारित्र्याचे धनी (साधी रहाणी, उच्च विचार सरणी असलेला नेता) लाल बहादूर शास्त्री. यांचे जीवन समजणे व समजून घेणे आणि अंमलात आणणे सगळ्याच गोष्टी अवघड आहेत. परंतू लेखकाने अत्यंत सोप्या नेमक्या व नेटक्या शब्दात सांगीतले आहे. १९४२ ची चळवळ त्यांचा तुरुंगवास, घरची साधी रहाणी, चीनचा विश्वासघात, भारत नेपाळ संबंधात फ ूट, हजरतबल प्रकरण, रेल्वे अपघात असे अनेक कसोटीचे प्रसंग त्यांच्या आयुष्यात घडले. पण या सर्वांना समर्थपणे तोंड कसे दिले. व त्यातून त्यांच्या निश्चयी स्वभावाची व उच्च कर्तृत्वाची ओळख अतिशय आदर व कौतुकाने करून दिली आहे.

अजातशत्रू नेता अटलबिहारी वाजपेयी अगदी उचित विशेषण योजून या भारतरत्नाची ओळख करुन दिली आहे. त्यांच्या बालपणीच्या आठवणी त्यांच्याच कवितेच्या ओळींमधून सांगीतल्या आहेत. यमुना तट, टीले रेतीले, माँ के मुँह में रामायण के दोहे -चौपाई रस घोले।

त्यांचे ग्वाल्हेरचे शिक्षण या पासून ते त्यांच्या संपूर्ण कार्याचा आढावा घेत त्यांच्या घरी जाऊन दिलेल्या सर्वोच्च पुरस्कारा पर्यंत लेखक आपल्याला प्रवास घडवतात. हे सगळे लेखकाच्या अनोख्या शैलीत पुस्तकात वाचणे अधिक योग्य ठरेल.

या नंतर आपल्या समोर येते गान कोकीळा, भारताची शान आनंदघन लता मंगेशकर सर्वच भारतीयांना जिचा अभिमान आहे. जिच्या सुरांनी सर्वांवर मोहीनी घातली आहे. जगभरात हा सूर निनादतो. जगाच्या पाठीवर कुठेही असलो तरी ऐकू येतो आणि जवळीक साधतो असा सूरी जणू या हारातील तन्मणी! या स्वरलतेचे बालपणी पासूनचे टिपलेले सुंदर बारकावे व त्यातून घडलेले संस्कार खूपच वाचनिय आहेत. लता नामक महावटवृक्षाचा एकंदर जीवन प्रवास मांडणे म्हणजे शिवधनुष्य पेलणे आहे. पण लेखकाने ते आपल्या लेखणीने समर्थपणे पेलले आहे. त्यांची सांगीतीक कारकिर्द अतिशय सुंदर व मनोवेधक पध्दतीने उलगडून दाखवली आहे.



विभावरी कुलकर्णी
८०८७८१०१९७

सर्व बारकावे वाचताना लेखक दर्दी व संगीतप्रेमी आहे, हे लक्षात येते. सदर पुस्तकातील जास्त पाने लतागान गुणगुणत आहेत असे जाणवते. तिच्या गाण्याचे रसग्रहण करताना कमोदिनी काय जाणे तो परिमळ.... या अभंगाचा आधार घेऊन लता नामक स्वरकमलाकडे रसिक श्रोते भ्रमराप्रमाणे कसे आकर्षित होतात ते सांगीतले आहे. या स्वरसाम्राज्ञीला शेवटी भा.रा. तांबे यांच्या शब्दात भावपूर्ण श्रध्दांजली वाहतात. या पुस्तकात शेवटी आपण भेटतो ते उज्वल भारताचे

स्वप्न पाहणारा ❋द्रष्टा वैज्ञानिक डॉ. अब्दुल कलाम❋ यांना.

त्यांचे कष्टमय बालपण, निः स्वार्थीपणे केलेली देशसेवा, त्यांचे विद्यार्थी प्रेम, त्यांची रुद्रवीणा वाजवण्याची आवड. त्यांनी लिहीलेली प्रेरणादायी पुस्तके हे सर्व बारकावे वाचायला मिळतात. त्यांची अपार विज्ञाननिष्ठा सर्वपरिचित आहे .शिवाय ते दररोज कुराण व भगवतगीता यांचे पारायण करतात. त्यांच्या आगळ्या वेगळ्या कार्यशैली मुळे ते राष्ट्रपती कसे बनले हे सर्व लेखकाच्या दृष्टीतून व सिद्धहस्त लेखणीले

लिहीलेले वाचणे अधिक योग्य आहे.

सदर अष्टदीप पुस्तक आपल्या मनात हे आठदीप उजळून आपल्याला प्रकाशमान करून टाकतात.

या पुस्तकाला तितिक्षा इंटरनॅशनलचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे.

मी हे पुस्तक का वाचले?

एकदा रेडिओवर संगीत व माहिती यावर आधारित कार्यक्रम आनंदघन लता मंगेशकर ऐकला. त्यातील निवेदक अतिशय शांत, धीरगंभीर आवाजात दिर्दीची माहिती सांगत होते. व त्यांनी हजारो गाण्यातून निवडलेली प्रसंगा नुरूप गाणी लावत होते. चौकशीअंती समजले की या कार्यक्रमाचे लेखन, सादरीकरण करणारे लेखक श्री विश्वास देशपांडे आहेत आणि हे लेखन त्यांच्या अष्टदीप पुस्तकातील आहे. त्यानंतर हे पुस्तक उत्सुकतेने वाचले, तर अतिशय सुंदर चरित्रे समोर आली. याच लेखकांची दहा पुस्तके प्रकाशित झाली अहित. व त्यातील ललित लेखाचे व रामायण महत्व आणि व्याक्तिविशेष याचे सादरीकरण रेडीओवर होत असते.त्यांची सगळीच पुस्तके अत्यंत सकारात्मक,अभ्यासपूर्ण, निरीक्षणात्मक असतात. भाषा अत्यंत सोपी, सहज असते. त्यामुळे ती आपल्याला आपलीच वाटतात.

अशीच अजून पुस्तके यावीत आणि आपण सर्वांनी ती आवर्जुन वाचावित. या सदिच्छे सह धन्यवाद !

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ: भारतीय राष्ट्रजीवनातील एक प्रभावी आणि लोकोपयोगी शक्ती

ज्योतिर्मय साहित्य

**(मागील अंकावरून)**

आम्ही जनतेचा विश्वास हाच आमचा सर्वांत मोठा निधी मानतो.'' संघाच्या कार्यपद्धतीत आर्थिक प्रामाणिकपणा आणि नैतिक जबाबदारी हे दोन महत्त्वाचे घटक आहेत. स्वयंसेवक कोणतीही वेतनभत्ता घेत नाहीत; त्यांचेते योगदान पूर्णतः स्वयंसेवी असते. प्रत्येक शाखा स्थानिक देणग्यांवर चालते, आणि त्या देणग्यांचा उपयोग स्थानिक समाजसेवा उपक्रमांसाठी केला जातो. ही 'स्वावलंबनावर आधारित व्यवस्था' असल्यामुळे संघावर आर्थिक भ्रष्टाचार, राजकीय प्रायोजकत्व किंवा अपारदर्शक निधी यांचे आरोप टिकत नाहीत. संघातील प्रचारक वर्ग हे संघाचे कणा मानले जातात. हे प्रचारक अनेकदा शिक्षण किंवा नोकरीच्या संधी सोडून पूर्णवेळ संघकार्याला वाहून घेतात. मागील शतकापासून अनेक स्वयंसेवक घरदारावर तुळशीपत्र ठेवून राष्ट्रसेवेच्या प्रेरणेने प्रचारक म्हणून संघासाठी आपली सर्व हयात समर्पित करत आले आहेत. त्यांना संघाकडून कोणताही वेतनभत्ता, मानधन किंवा सवलत दिली जात नाही. त्यांचा प्रवास, राहणे, भोजन इत्यादींची व्यवस्था स्थानिक स्वयंसेवक आणि कार्यकर्ते करतात. ही सेवाभावी जीवनशैली संघाच्या कार्यपद्धतीला केवळ आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करत नाही, तर तिला नैतिक आणि आध्यात्मिक बलही देते. संघातील स्वयंसेवक आणि प्रचारकांचे हे निस्वार्थ कार्यच संघाला 'जनाधारित' आणि 'लोकशाही पद्धतीने चालणारी संस्था' बनवते. संघाच्या शाखा, कार्यालये किंवा उपक्रमांमध्ये कोणत्याही प्रकारचा दिखाऊपणा नसतो. शाखा सामान्यतः शाळेच्या मैदानावर, उद्यानात किंवा सार्वजनिक जागी उघड्या आकाशाखाली घेतली जाते. त्यासाठी कोणतेही स्थायी इमारत भाडे, उपकरणे किंवा मोठा खर्च लागत नाही. संघाच्या सर्व बैठक, प्रशिक्षण शिबिरे किंवा सेवा प्रकल्प यांचाही खर्च अत्यंत मर्यादित असतो. ही साधी, लोकाभिमुख आणि व्यावहारिक कार्यसंस्कृती संघाच्या आर्थिक शुचिता टिकवून ठेवते. संघाच्या सर्व पातळ्यांवर शाखा, तालुका, जिल्हा आणि प्रांतिक स्तरावर आर्थिक व्यवहारांचे काटेकोर लेखाजोखा ठेवला जातो. प्रत्येक देणगी नोंदवली जाते आणि वार्षिक अहवालाच्या स्वरूपात त्या वापराचे विवरण केले जाते. संघाचे कोणतेही वित्तीय व्यवहार गुप्तपणे किंवा नकद स्वरूपात होत नाहीत; ते बँकिंग पद्धतीनेच केले जातात. अशा प्रकारे, आर्थिक जबाबदारी आणि पारदर्शकता ही संघाच्या संस्कारांचा अविभाज्य भाग बनली आहे. संघ कधीही आपल्या आर्थिक कार्यात सरकार, उद्योग, राजकीय सत्ता किंवा परकीय निधी यांवर अवलंबून राहिलेला नाही. आणि याचमुळे संघाचे कार्य कोणत्याही बाह्य दबावाखाली येत नाही आणि संघाची स्वायत्तता पूर्णतः अबाधित राहते. हीच कारणे आहेत की संघावर आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार किंवा राजकीय प्रायोजकत्वाचे आरोप कधीही सिद्ध झाले नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आर्थिक पायाभूत रचना ही नैतिकतेवर आणि लोकाधारित आहे. संघाचे बळ हे पैशात नाही, तर स्वयंसेवकांच्या निष्ठेत आहे. स्वयंसेवकांचा सेवाभाव, प्रचारकांचा त्याग आणि गुरुदक्षिणेची परंपरा हीच संघाच्या स्वावलंबनाची खरी ओळख आहे. गुरुदक्षिणेच्या माध्यमातून संघाने समाजाला शिकवले आहे की 'सेवा म्हणजे त्याग, आणि त्यागातूनच राष्ट्रनिर्माण शक्य आहे.'

संघावर कधी कधी संविधान नाकारणारा किंवा लोकशाहीविरोधी असल्याचे आरोप केले जातात; मात्र हे आरोप वास्तवाशी सुसंगत नाहीत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने नेहमीच भारतीय संविधानाचा सन्मान केला असून नागरिक कर्तव्यांचे पालन आणि लोकशाही मूल्यांचे जतन करण्यावर भर दिला आहे. संघाची भूमिका ही संविधानविरोधी नसून, समाजाला जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ नागरिक घडविण्याची आहे. १९७५ च्या आणीबाणीच्या काळात संघाने लोकशाहीच्या रक्षणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्या काळात संघावर बंदी असतानाही अनेक स्वयंसेवक भूमिगत राहून सत्याग्रहात सहभागी झाले आणि लोकशाही पुनर्स्थापित करण्याच्या चळवळीत सक्रिय योगदान दिले. हे संघाच्या लोकशाही निष्ठेचे ठोस उदाहरण मानले जाते. संघाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'संविधानाचे





शिल्पकार' म्हणून सदैव मान दिला आहे. बाबासाहेबांच्या सामाजिक न्याय, समता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून संघ आपले कार्य करतो. तसेच संघावर बंदीची मागणी प्रामुख्याने विचारधारात्मक मतभेदांवर आधारित असल्याचे दिसून येते. काही राजकीय किंवा वैचारिक गट संघाच्या राष्ट्रवादी भूमिकेला 'बहुसंख्यकवादी' ठरवतात; मात्र न्यायालयांनी विविध प्रसंगी स्पष्ट केले आहे की संघाचे कार्य कायद्याच्या चौकटीत, लोकशाही व्यवस्थेच्या परिघात आणि समाजहिताच्या दृष्टीने चालते. लोकशाही व्यवस्थेत मतभेद स्वाभाविक आणि स्वीकारार्ह असतात. तथापि, केवळ वैचारिक असहमतीच्या आधारावर एखाद्या संस्थेवर बंदी घालण्याची भाषा वापरणारे राजकीय पक्ष हेच खऱ्या अर्थाने विचारस्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचवणारे ठरतात. त्यामुळे संघावरील आरोप करताना तथ्य, घटनात्मक चौकट आणि लोकशाही परंपरा यांचा समतोल दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक ठरते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य केवळ विचारप्रसारापुरते मर्यादित नसून ते प्रत्यक्ष समाजजीवनाच्या प्रत्येक स्तरावर खोलवर उतरलेले आहे. संघाची मुळ विचारधारा म्हणजे 'राष्ट्रसेवा म्हणजे समाजसेवा' असून या तत्त्वानुसार स्वयंसेवकांचा सहभाग शिक्षण, आरोग्य, आपत्ती निवारण, ग्रामविकास, पर्यावरण, आणि सामाजिक समरसता अशा असंख्य क्षेत्रांत जाणवतो. संघाचे स्वयंसेवक कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी सर्वप्रथम मदतीला धावून येतात. १९६२ च्या भारत-चीन युद्धात सीमेवरील मदतकार्य असो, १९९३ च्या लातूर भूकंपात बचावकार्य असो किंवा २०१८ च्या केरळ पूरस्थितीत मदत केंद्रांचे आयोजन असो किंवा मग कोरोनामुळे देशभर मदत कार्य पोहचविणे असो संघाचे स्वयंसेवक नेहमी अग्रभागी राहिले आहेत. पूर, चक्रीवादळ, भूकंप, दुष्काळ अशा प्रसंगी संघाच्या सेवा भारती, जनकल्याण समित्या आणि स्थानिक शाखांमधून तातडीचे मदतकार्य, रक्तदान, अन्नधान्य वितरण, तसेच पुनर्वसन केंद्रांची उभारणी केली जाते. संघाच्या प्रेरणेने स्थापन झालेली 'विद्या भारती आणि अखिल भारतीय शिक्षण संस्था' आज भारतातील सर्वांत मोठी शिक्षणसंस्था म्हणून ओळखली जाते. देशभरातील २५,००० हून अधिक शाळा, लाखो विद्यार्थी आणि हजारो शिक्षक या माध्यमातून कार्यरत आहेत. या शाळांमध्ये केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त, देशभक्ती आणि सामाजिक जबाबदारी यांचे मूल्यर रुजवले जाते. 'भारतीय संस्कृतीवर आधारित आधुनिक शिक्षण' ही या शिक्षणप्रणालीची खास ओळख आहे. संघाच्या सेवा भारती, जनकल्याण समिती, आरोग्य भारती आणि इतर उपक्रमांद्वारे देशभरात हजारो आरोग्य केंद्रे, रक्तदान शिबिरे, आयुर्वेदिक उपचार केंद्रे आणि ग्रामीण आरोग्य प्रकल्प राबवले जातात. विशेषतः दुर्गम व वनवासी प्रदेशांमध्ये वनवासी कल्याण आश्रम या संस्थेच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि संस्कृती संरक्षणाचे कार्य होत आहे. संघाच्या कार्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे समरसतेचे संस्कार. संघाच्या दृष्टीने समाजातील जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा आर्थिक स्थिती यांच्या आधारावर कोणताही भेदभाव नाही. 'सर्व भारतीय हे एकाच मातृभूमीचे पुत्र आहेत' या भावनेतून संघाचे कार्य उभे आहे. 'समरसता अभियान' आणि 'एकात्म मानववाद' या संकल्पनांद्वारे संघ समाजातील सर्व घटकांमध्ये बंधुभाव, सन्मान आणि सहअस्तित्व यांचा संदेश देतो. अस्पृश्यता निर्मूलन, अंतरजातीय विवाह प्रोत्साहन, आणि ग्रामीण समाजातील शिक्षण-जागरूकता या दिशेनेही स्वयंसेवक सतत प्रयत्नशील असतात. संघाचे स्वयंसेवक नेहमी 'वसुधैव कुटुंबकम्' या भारतीय तत्त्वज्ञानाची सजीव प्रचिती देत असतात. याचमुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा आज भारतीय समाजजीवनातील एक लोकोपयोगी, विश्वासार्ह आणि प्रेरणादायी घटक ठरला आहे.संघासाठी राष्ट्रसेवा म्हणजे केवळ राजकारण नव्हे, तर सांस्कृतिक राष्ट्रवादाचा जागर आहे. याच दृष्टीने संघाने भारतीय इतिहास, परंपरा, विज्ञान आणि भाषा यांचा गौरव पुनर्स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. संघ प्रेरित संस्था जसे की भारतीय जनता पक्ष (), भारतीय मजूर संघ (), विश्व हिंदू परिषद () या सर्व संस्थांनी आपापल्या क्षेत्रांत सामाजिक न्याय, कामगार सन्मान आणि सांस्कृतिक जागृती यासाठी मोठे योगदान दिले आहे. 'संघाची ओळख राष्ट्रवादात आहे, पण त्याचे हृदय मात्र लोकसेवेत आहे.' संघावर झालेल्या बंदी राजकीय स्वरूपाच्या होत्या, न्यायालयीन नाहीत. संघाचे भारतीय संविधानाशी नाते हे विरोधाचे नव्हे, तर पूरक आणि सन्मानाचे आहे. आज संघ लाखो स्वयंसेवकांच्या माध्यमातून समाजनिर्माण, नैतिकता आणि देशभक्तीचे संस्कार रुजवतो आहे.



प्रा. कौशिक म. हरणे
नूतन महाराष्ट्र एस्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, पुणे
मो.क्र: ९६७३१७५१९७

त्यामुळे असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही की ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही केवळ एक संस्थाच नाही, तर भारतीय समाजाचा आत्मा देखील आहे.''

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559